# मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ
दापोली, जि. रत्नागिरी ४१५७१२ (महाराष्ट्र)
ceswakawali@gmail.com & ddoces1974@gmail.com


जा.क्र.मसंके/प्रअ—टेट/जसंनि/ ११२१ / २०२३ दिनांक :— ८ / ९ /२०२३
2670 08 SEP 2023

## निरूपयोगी कार्यालयीन साहित्य, यंत्र व उपकरणे विक्री बाबतची जाहिरात

| अ. क्र. | विभागाचे नाव | अनामत रक्कम रूपये | दरपत्रक उघडण्याचे दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| १ | टेटवली विभाग | ६५००/— | दि. ०४/१०/२०२३ वेळ :— सकाळी १०.३० स्थळ :— सभागृह कक्ष मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली, ता. दापोली, जि. रत्नागिरी |

### अटि व शर्ती

१. ठेकेदाराने मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली यांच्या अधिपत्याखाली असणाऱ्या टेटवली विभागातील निरूपयोगी जडवस्तु संग्रह साहित्याची अनामत रक्कमेचा धनाकर्ष (डी.डी) **''डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ''** या नावाने दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

२. दरपत्रकासोबत **पॅनकार्ड, आधार कार्डच्या छायांकित प्रति** आणि अनामत रक्कमेचा **धनाकर्ष (डी.डी)** जोडणे आवश्यक आहे, जोडले नसल्यास ते दरपत्रक ग्रहय धरले जाणार नाही.

३. विक्री ही बंद लखोटा पध्दतीने असुन भाग घेणाऱ्या ठेकेदाराने आपली रक्कम नमुद करून लखोटा सिलबंद करून वाकवली कार्यालयात उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या टपाल पेटीमध्ये दिनांक :— ०३/१०/२०२३ रोजी सायंकाळी ५:३० पर्यंत कार्यालयीन वेळेपर्यंत टाकण्यात यावेत, उशीरा येणाऱ्या ठेकेदाराचे लखोटे स्विकारण्यात येणार नाहीत.

४. दरपत्रके उघडण्याची प्रक्रिया दिनांक :— ०४/१०/२०२३ रोजी ठिक सकाळी १०.३० वाजता मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली येथील सभागृहात होईल. विक्री प्रक्रिया ही कार्यालयीन पध्दतीचा अवलंबन करून लखोटे उघडण्यात येतील आणि सर्वात जास्त दर असलेल्या ठेकेदारास सदर निरूपयोगी वस्तुंची उचल करण्यासंबधी कळविण्यात येईल.

५. ज्या ठेकेदाराने सर्वात जास्त दर नमुद केलेला असेल त्याने संपुर्ण रक्कम संबंधीत विभागास भरणा करून पुढील एक आठवडयाच्या आधी कार्यालयीन वेळेत आणि कार्यालय प्रमुखांच्या समक्ष सर्व निरूपयोगी जडवस्तु संग्रह साहित्याची स्वखर्चाने उचल करून वाहतुक करावयाची आहे.

६. टेटवली विभाग या ठिकाणी असलेले निरूपयोगी जडवस्तु संग्रह साहित्य '' जेथे आहे जसे आहे'' प्रत्यक्ष पाहणी या तत्वावर बंद लखोटा पध्दतीने विक्री करावयाचे आहे. सदरचे साहित्य दिनांक :— २५/०९/२०२३ ते दिनांक :— ०३/१०/२०२३ या कालावधीत वेळेत **सुट्टीचे दिवस वगळुन** पहावयास मिळेल.

७. विक्री केलेले साहित्याबाबत नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

८. वरील प्रक्रियेप्रमाणे ज्याचे दरपत्रक मंजुर झाले आहे त्याने दरपत्रकात नमुद केलेली पुर्ण रक्कम एक आठवडयाच्या आत भरणा न केल्यास आणि निरूपयोगी

कार्यालयीन साहित्य न उचलल्यास त्याची जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच त्यासंबंधीत निर्णय घेण्याचे अधिकार हे मा. अध्यक्ष, निरूपयोगी जडवस्तु संग्रह साहित्य विक्री समिती यांनी राखुन ठेवले आहेत.

९. साहित्याची उचल करताना प्रक्षेत्राचे अथवा कार्यालयाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई संबंधीतांकडुन घेण्यात येईल.

१०. साहित्य विक्री करणे अथवा योग्य किंमत न मिळाल्यास विक्री प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार राखुन ठेवलेले आहेत.

११. विक्री प्रक्रियेत अपेक्षीत रक्कम प्राप्त न झाल्यास सदर विक्री प्रक्रियेत उपलब्ध असलेल्या दरपत्रके धारकांकरवी उघड बोली पध्दतीने निरूपयोगी साहित्याचा लिलाव करण्याचा अधिकार राखुन ठेवण्यात येत आहे.

१२. सर्वात जास्त दर नमुद केलेल्या पहिल्या तीन ठेकेदारांच्या अनामत रकमेचे धनाकर्ष कार्यालयात जमा करण्यात येतील व उर्वरीत इतर सहभागी ठेकेदारांच्या अनामत रकमेचे धनाकर्ष विक्री प्रक्रिया पुर्ण झाल्यावर परत करण्यात येतील.

०८/०१/२३

अध्यक्ष
विक्री समिती तथा संचालक,
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली
ता.दापोली, जि.रत्नागिरी